॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२४–२५/९४ दिनांक १६/०७/२०२४

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमीत्त "चला जाणुया नदीला" या मोहिमेत विद्यार्थ्यांना सहभागी करणे बाबत.**

**संदर्भ:** मा.विकास कुलकर्णी, मा. राज्यपाल महोदयांचे, प्र. अवर सचिव (ई) यांचे जा.क्र. RB/Gen-2024/D-7143062/Edn.1/739 Dated 10th July 2024

**महोदय,**

उपरोक्त विषयी मा.विकास कुलकर्णी, मा. राज्यपाल महोदयांचे, प्र. अवर सचिव (ई) यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमीत्त महाराष्ट्र शासनाने पूर आणि दुष्काळमुक्ती **"चला जाणुया नदीला"** हे अभियान २ ऑक्टोबर २०२२ पासून सुरू केले आहे. महाराष्ट्राला पूर आणि दुष्काळापासून मुक्त करण्यासाठी नद्यांची निर्मलता ही अपरिहार्य बाब आहे. महाराष्ट्र राज्याने आपल्या २०१८ च्या जलधोरणामध्ये स्पष्ट केलेले आहे. याच पार्श्वभूमीवर स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्त राज्यातील सुमारे ७५ नद्या अभ्यासाला घेऊन लोकसहभागाने त्यांच्यावरील होत असलेल्या बदलांचा, आघातांचा, अभ्यास करून त्यात कृतिशिल ते बदल करण्याच्या उद्देशाने हे अभियान सर्वत्र सुरू केलेले आहे. त्यानुषंगाने उन्नत महाराष्ट्र अभियान आणि उन्नत भारत अभियान या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नद्यांवरील अभ्यास करणे उपाययोजना त्यातील तांत्रिकता इत्यादी बाबी महत्वाच्या ठरणार आहेत. त्या मुळे विद्यार्थ्यांना एका ज्वलंत विषयावर प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळेल आणि या अभियानासाठी पाठबळ मिळेल तद्वतच राज्याच्या नद्यांची सद्यस्थिती देखील स्पष्ट होईल असे कळविले आहे.

त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व

महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमीत्त **"चला जाणुया नदीला"** या मोहिमेत आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी होण्यास कळविण्यात यावे ही विनंती.

**टिप:** अधिक माहितीसाठी खालीलप्रमाणे संपर्क साधण्यात यावा.
१) डॉ. सुमंत पांडे – ९७६४००६६८३
२) श्री नरेंद्र चुघ – ९८५००७४९५२

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**प्रत माहितीस्तव:**
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.